ePaper
देवास हादरलं! फटाका फॅक्टरीमध्ये भीषण स्फोट, 15 जणांच्या मृत्यूची भीती

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 15 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





आळंदी हादरली! घरात घुसून महिलेवर सामूहिक अत्याचार

## घटनेचा परराष्ट्र मंत्रालयाकडून निषेध; १३ भारतीय जहाजं अद्याप अडकलेलीच!

# भारतीय जहाजावर ओमानमध्ये हल्ला

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**ओमानच्या किनारपट्टीजवळ भारतीय ध्वज असलेल्या एका व्यापारी जहाजावर भीषण हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यामुळे आखाती देशांमधील तणाव आता सर्वोच्च पातळीवर पोहोचला असून भारताने या कृत्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. सुदैवाने, ओमानच्या प्राधिकरणाने तातडीने बचाव मोहीम राबवून सर्व भारतीय क्रू मेंबर्सना सुरक्षित बाहेर काढले आहे. मात्र, "व्यापारी जहाजांवरील असे हल्ले भारत कदापि सहन करणार नाही," असा इशारा परराष्ट्र मंत्रालयाने दिला आहे.**




### युद्धाचा भडका आणि भारतीयांचे बळी

इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या निधनानंतर इराणच्या रिव्होल्यूशनरी गार्ईसने होर्मुजची सामुद्रधुनी ओलांडणाऱ्या जहाजांना इशारा दिला आहे. या आधीही या संघर्षात अनेक भारतीयांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. १ मार्च २०२६ रोजी 'स्कायलाईट' तेल टँकरवर झालेल्या हल्ल्यात २ भारतीय खलाशांचा मृत्यू झाला. 'MKD VYOM'वर झालेल्या ड्रोन हल्ल्यात एका भारतीय खलाशाने जीव गमावला.'AYEH' या जहाजावर झालेल्या हल्ल्यात एक भारतीय गंभीर जखमी झाला होता.

### भारताची आंतरराष्ट्रीय समुदायाला साद...

भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाकडे समुद्री व्यापार मार्गांच्या सुरक्षेसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. "नौकानयनाचे स्वातंत्र्य आणि वाणिज्य बाधित करणे थांबवले पाहिजे," असे भारताने ठामपणे सांगितले आहे. ओमान सरकारने केलेल्या तत्पर मदतीबद्दल भारताने त्यांचे आभार मानले आहेत.

### भारतीय नौदल हाय अलर्टवर



जगातील ९५ टक्के व्यापार समुद्री मार्गाने होत असताना अशा हल्ल्यांमुळे केवळ भारताचीच नाही, तर जागतिक अर्थव्यवस्था धोक्यात आली आहे. या घटनेनंतर भारतीय नौदल आणि तटरक्षक दलाने या क्षेत्रात आपली गस्त आणि देखरेख वाढवली आहे. सर्व भारतीय जहाजांना विशेष 'सुरक्षा प्रोटोकॉल' पाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### नेमकं काय घडलं?

२८ फेब्रुवारी २०२६ पासून अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे अरबी समुद्रातील परिस्थिती स्फोटक बनली आहे. या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, ओमानच्या तटाजवळ भारतीय जहाजाला लक्ष्य करण्यात आले. परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, "व्यापारी जहाजे आणि निष्पाप खलाशांना वारंवार लक्ष्य केले जाणे हे पूर्णपणे अस्वीकार्य आहे. आम्ही या हल्ल्याचा तीव्र निषेध करतो."



# स्वारगेट ते कात्रज मेट्रोच्या कामाला वेग

## पुणेकरांसाठी खुशखबर! बोगद्यासाठीच्या काँक्रीट सेगमेंट कास्टिंगचा श्रीगणेशा

महाईन्यूज । पुणे

**पुणे शहरातील मेट्रोचे जाळे दिवसेंदिवस विस्तारत आहे. यामुळे पुणेकरांचा प्रवास आणखी सुकर न आरामदायी होत आहे. शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत मैलाचा दगड ठरणाऱ्या पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते कात्रज या विस्तारित मार्गिकेच्या कामाला आता गती मिळाली आहे. या मार्गिकेवरील महत्त्वाच्या टप्प्यातील कामाला सुरुवात झाली आहे.**



स्वारगेट ते कात्रज मेट्रो या ५.४६ किलोमीटर लांबीच्या भुयारी मार्गिकेसाठी आवश्यक असलेल्या पहिल्या ‘टीबीएम टनेल सेग्मेंट’च्या कास्टिंगचे काम सुरू झाले आहे. ‘महामेट्रो’चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते हे कास्टिंगचे काम सुरू करण्यात आले. या प्रसंगी महामेट्रोचे संचालक (कार्य) अतुल गाडगीळ, संचालक (प्रणाली व संचालन) विनोदकुमार अग्रवाल, संचालक (वित्त) हरेंद्र पांडे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी आणि कंत्राटदार कंपनी ‘सीईएम इंडिया’चे प्रतिनिधी उपस्थित होते. स्वारगेट ते कात्रज या विस्तारित मार्गिकेमुळे दक्षिण पुणे थेट मेट्रोच्या जाळ्याशी जोडले जाणार आहे.

या मार्गावर एकूण पाच भुयारी स्थानके असणार आहेत.

स्वारगेट ते कात्रज हा मार्ग पूर्णतः भुयारी असून, त्याचे बांधकाम अत्याधुनिक ‘टनेल बोरिंग मशिन’द्वारे केले जाणार आहे. या बोगद्याच्या अंतर्गत मजबुतीकरणासाठी प्रीकास्ट आरसीसी ‘सेग्मेंट’चा वापर केला जातो. या मार्गिकेवरील दोन्ही बाजूंचे बोगदे मिळून ९.७ किलोमीटर लांबीच्या मार्गासाठी एकूण ६ हजार ९९३ रिंग तयार केल्या जाणार आहेत. प्रत्येक रिंग ही पाच ‘सेग्मेंट’ आणि एक ‘की सेग्मेंट’ या रचनेत असेल. यासाठी ‘सीबीई’ ग्रुपचे आठ विशेष साचे वापरले जात आहेत. मेट्रोच्या बोगद्याचा बाह्य व्यास ६.३५ मीटर असून, अंतर्गत व्यास ५.८ मीटर आहे. प्रत्येक सेगमेंटची जाडी २७५ मिलिमीटर असून, रिंगची रुंदी १.४ मीटर आहे.

### स्वारगेट ते कात्रज मार्गावरील स्थानके

मार्केट यार्ड
बिबवेवाडी
पद्मावती
बालाजीनगर
कात्रज

### वेळ अन् इंधनाची बचत

स्वारगेट ते कात्रज हा मार्ग पुणेकरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. पहिल्या सेग्मेंटचे कास्टिंग सुरू होणे हे या प्रकल्पाच्या वेगाचे प्रतीक आहे. दर्जा आणि सुरक्षिततेची सर्व मानके पाळून हे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. या मार्गिकेमुळे स्वारगेट, धनकवडी, पद्मावती आणि कात्रज परिसरातील वाहतूककोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार असून, प्रवाशांचा वेळ आणि इंधन वाचणार आहे, असे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

## ‘व्हीआयपीं’च्या शहरातील दौऱ्याचा ताफा आता निम्म्यावर! पुणे पोलिसांचा निर्णय

महाईन्यूज । पुणे

**महत्त्वाच्या व्यक्तींच्या (व्हीआयपी) शहरातील दौऱ्यांमध्ये रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांचा ताफा आता ५० टक्क्यांवर येणार आहेत. इंधन बचत, सरकारी खर्चावर नियंत्रण आणि साधेपणाला प्राधान्य देण्याच्या केंद्र आणि सरकारच्या धोरणानुसार पुणे पोलिसांनी व्हीआयपींच्या दौऱ्यातील वाहनांची संख्या निम्म्याने कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे शहरातील व्हीआयपी दौरे कमी वाहनांमध्ये होणार आहेत.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन आणि परकीय चलन बचतीसाठी केलेल्या आवाहनानंतर राज्य सरकारने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तत्काळ प्रभावाने कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बाहेरच्या दौऱ्यांदरम्यान निर्धारित संख्येपेक्षा अधिक वाहने ताफ्यात नसतील, याची जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांवर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार आता पुण्यात देखील ताफ्यातील वाहने कमी होणार आहेत, असे पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सांगितले.



अमितेशकुमार म्हणाले, ‘पूर्वी एखाद्या व्हीआयपी दौऱ्यासाठी सुरक्षा आणि राजशिष्टाचारानुसार (प्रोटोकॉल) साधारणपणे १२ ते १३ वाहनांचा ताफा ठेवला जात होता. मात्र, आता ही संख्या कमी करून केवळ ५ ते ६ वाहनांपर्यंत मर्यादित ठेवण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, अनेक व्हीआयपी व्यक्ती स्वतःहून दूरध्वनी करून आपल्या दौऱ्यात कमीत कमी वाहनांचा वापर करण्याची विनंती करत आहेत. राज्यात देखील आता अनावश्यक बाबी कमी केल्या जात आहेत. मंत्री आणि अधिकाऱ्यांनी अत्यावश्यक नसल्यास शासकीय विमान व हेलिकॉप्टरचा वापर टाळावा, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करावा, बैठका व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घ्याव्यात, तसेच शासकीय वाहनांचा काटेकोर आढावा घ्यावा, अशा सूचना राज्यस्तरावरून देण्यात आल्या आहेत.’

### वाहतूक कोंडीतूनही दिलासा?

पुण्यातील अनेक प्रमुख रस्त्यांवर सदैव वाहतूक कोंडीची समस्या असते. त्यात व्हीआयपी दौऱ्याच्या वेळी मोठा वाहनताफा रस्त्यावर उतरल्याने संबंधित परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत होत होती. अनेकदा सिग्नल बंद ठेवून वाहतूक रोखावी लागत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत होता. आता व्हीआयपी ताफ्यातील वाहनांची संख्या निम्म्यावर आणण्याचा निर्णय झाल्याने वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुनावळे शाळा आरक्षण खासगीकरणाला विरोध

## नगरसेवकांचा ठाम पवित्रा; महापालिकेनेच शाळा उभारावी अशी मागणी

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पुनावळे येथील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेली सुमारे ०.९१ हेक्टर (अंदाजे २ एकर ९१ गुंठे) जमीन खासगी संस्थेला अवघ्या ७ कोटी रुपयांना ३० वर्षांच्या दीर्घकालीन भाडेतत्त्वावर देण्याच्या प्रशासनाच्या प्रस्तावाला स्थानिक नगरसेवकांनीही विरोधाची भूमिका घेतली आहे. स्थानिक नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने वाकड येथे उभारलेल्या शाळेच्या धर्तीवर पुनावळेत माध्यमिक शाळेचे आरक्षण विकसित करावे. यासाठी नगरसेवक सर्वसाधारण सभेत सभागृहाचे लक्ष वेधणार आहेत.**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक २५ मध्ये पुनावळे येथील सर्वे क्रमांक ३८ पै. व ४४ पै. मधील ही जमीन विकास आराखड्यात (DP) स्पष्टपणे 'माध्यमिक शाळा' म्हणून आरक्षित असून ती सध्या महापालिकेच्या ताब्यात आहे. अशा महत्त्वाच्या सार्वजनिक उपयोगाच्या जागेचा खासगीकरणाकडे कल जाणे हे नागरिकांच्या हिताविरोधी असल्याचा आक्षेप पिंपरी-चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनने घेतला होता. याबाबत पुनावळेतील स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांनीही प्रशासनाच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली होती. सदर खासगीकरण विरोधात स्थानिक नागरिक, सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सामाजिक संघटना आक्रमक झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनने मुख्यमंत्री कार्यालय, महापालिका आयुक्त, महापौर तसेच विभागीय आयुक्त कार्यालयाला सविस्तर निवेदन दिले होते.

दरम्यान, सुमारे ७ कोटी रुपयांच्या नाममात्र मोबदल्यात ही उच्च बाजारमूल्य असलेली जमीन ३० वर्षांसाठी खासगी संस्थेला देणे हे आर्थिकदृष्ट्या चुकीचे व सार्वजनिक मालमत्तेच्या दृष्टीने नुकसानकारक आहे. अशा निर्णयामुळे भविष्यात महापालिकेच्या उत्पन्नावर आणि शिक्षण धोरणावर परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र, स्थायी समितीसमोर असलेला हा प्रस्ताव मुख्य सभेत व्यापक चर्चा व्हावी यासाठी पाठवला आहे.

पुनावळे परिसरातील विद्यार्थ्यांचे भवितव्य, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण आणि परवडणाऱ्या शिक्षणाचा हक्क लक्षात घेऊन महापालिकेने या प्रस्तावाचा पुनर्विचार करावा, अशी एकमुखी मागणी नागरिक व संस्थांकडून करण्यात येत आहे. निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता राखूनच पुढील पावले उचलावीत, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> “ माध्यमिक शाळा आरक्षणाची जागा खासगी संस्थेला देण्याबाबत आमचा विरोध आहे. त्या ठिकाणी महापालिका प्रशासनाने स्वत: शाळा उभारावी. या बाबत आम्ही आयुक्तांना मागणी करणार आहोत. **- रेश्मा भुजबळ, नगरसेविका, प्रभाग-२५.**




> “ वाकड येथे महापालिका प्रशासनाने आधुनिक सोयी-सुविधा असलेली शाळा उभारली आहे. त्याच धर्तीवर पुनावळेतील शाळेचे आरक्षण प्रशासनाने विकसित करावे. **- श्रुती वाकडकर, नगरसेविका, प्रभाग-२५.**

> “ शाळा आरक्षण खासगीकरणाला आमचा विरोध आहे. या ठिकाणी प्रशासनाने शाळा बांधावी. गोरगरिब विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी शिक्षणाची सुविधा झाली पाहिजे. **- कुणाल वाव्हळकर, नगरसेवक, प्रभाग-२५.**

> “ माध्यमिक शाळा आरक्षणाचे खासगीकरण हा विषय मला प्रसारमाध्यमांमध्ये समजला. नाममात्र शुल्क घेवून जागा खासगी संस्थेला देणे अयोग्य आहे. याबाबत सविस्तर माहिती घेणार आहे. लोकहिताचा निर्णय घेतला जाईल, यासाठी पाठपुरावा करतो. **- राहुल कलाटे, नगरसेवक, प्रभाग-२५.**

> “ पुनावळेतील शाळा आरक्षणाची जागा खासगी संस्थेला देण्याबाबतचा प्रस्ताव हा प्रशासनाने आणला आहे. स्थायी समितीने मुख्य सभेला शिफारस करावी, असा प्रस्ताव होता. महापालिकेला ७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल, असा विषय आहे. मात्र, सोसायटीधारकांनी त्याला विरोध केला आहे, असे प्रसारमाध्यमांमध्ये दिसून आले. या विषयाला मंजुरी द्यावी किंवा नाही. याबाबत व्यापक जनहिताच्या दृष्टीने सविस्तर चर्चा व्हावी. या करिता हा विषय आम्ही मुख्य सभेकडे पाठवला आहे. **- अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती.**

# आळंदी हादरली! घरात घुसून महिलेवर सामूहिक अत्याचार

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**आळंदी परिसरात एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. एका महिलेच्या घरात जबरदस्तीने घुसून तिला मारहाण करत सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.**




पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार ही घटना ७ एप्रिल रोजी घडली. आरोपींनी संगनमत करून पीडितेच्या घरात बेकायदेशीरपणे प्रवेश केला. यावेळी त्यांनी महिलेला बेदम मारहाण केली आणि तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेतले. त्यानंतर आरोपींनी तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. आरोपींनी केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडितेचे घर त्यांच्या नावावर करून देण्यासाठी धमकावले. घर नावावर कर, अन्यथा तुला आणि तुझ्या कुटुंबाला गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही त्यांनी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

तक्रारीत नमूद केल्यानुसार आरोपी गेल्या चार ते पाच महिन्यांपासून पीडितेला त्रास देत होते. यापूर्वीही त्यांनी पीडितेच्या घरी येऊन तिचा शारीरिक छळ केला होता. तसेच पीडितेच्या नातेवाईकांशी गैरवर्तन करून त्यांची सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकीही आरोपींनी दिली होती. या छळामुळे पीडित महिला आणि तिचे कुटुंब प्रचंड दहशतीखाली होते.

या प्रकरणी पोलिसांनी अभिमन्यू आंधळे, नारायण खंदारे, श्याम महाराज राठोड, राहुल चोरेडिया, कालिनाथ गुलाबराव घुले, युवराज खरमाटे आणि एका महिला आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दिघी पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून आरोपींच्या अटकेसाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. या घटनेमुळे आळंदी आणि परिसरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### अत्याचार प्रकरणाने खळबळ

आळंदी परिसरात महिलेवर घरात घुसून सामूहिक अत्याचार केल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाण, लूट आणि धमक्यांमुळे पीडित कुटुंब दहशतीत होते; पोलिसांनी आरोपींच्या अटकेसाठी पथके रवाना केली आहेत.

### घरात घुसून अमानुष अत्याचार


आरोपींनी संगनमत करून महिलेच्या घरात जबरदस्ती प्रवेश करत मारहाण, दागिने हिसकावणे आणि सामूहिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून घर नावावर करण्यासाठी धमक्या दिल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे.



## भूमिका

**वैद्यकीय शिक्षणासाठीची 'नीट' परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द होणे, ही केवळ प्रशासकीय चूक नाही तर देशाच्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाला बसलेला मोठा धक्का आहे. लाखो विद्यार्थ्यांनी दोन-दोन वर्षे प्रचंड मेहनत घेतली, पालकांनी आर्थिक ताण सहन करून खासगी शिकवणींची फी भरली आणि भविष्याची स्वप्ने रंगवली.**

# पेपरफुटीचा पुनरावृत्तीचा शाप



मात्र परीक्षा झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांत प्रश्नपत्रिका फुटल्याचे उघड झाल्याने विद्यार्थ्यांच्या आशांवर पाणी फिरले. चीड, संताप, निराशा आणि हतबलता या भावना त्यांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. 'एनटीए'ने परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला असला, तरी या घटनेतून संस्थेचे गंभीर अपयश स्पष्ट दिसते.

विशेष म्हणजे, ही घटना पहिल्यांदाच घडलेली नाही. दोन वर्षांपूर्वीही पेपरफुटी झाली होती आणि त्या वेळी सीबीआयने सर्वोच्च न्यायालयात सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटींची सविस्तर माहिती दिली होती. म्हणजेच यंत्रणेला धोका माहिती असूनही आवश्यक सुधारणा करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे आज पुन्हा त्याच चुका विद्यार्थ्यांना भोगाव्या लागत आहेत.

यंदाच्या परीक्षेतील अनेक प्रश्न आधीच काही गटांमध्ये फिरत असल्याचे स्पष्ट झाले. राजस्थान, बिहार, महाराष्ट्र, हरियाणा अशा अनेक राज्यांत या गैरप्रकाराचे धागेदोरे सापडले. यामुळे 'एनटीए'च्या परीक्षा व्यवस्थापन क्षमतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

यूजीसी-नेटसारख्या इतर परीक्षाही यापूर्वी गैरप्रकारांच्या संशयामुळे पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. म्हणजेच ही समस्या केवळ एका परीक्षेपुरती मर्यादित राहिलेली नाही. राधाकृष्णन समितीने दोन वर्षांपूर्वीच संगणकाधारित परीक्षा घेण्याची शिफारस केली होती. ऑनलाइन पद्धतीमुळे प्रश्नपत्रिका थेट परीक्षेपूर्वी पाठवता येतात आणि गळतीचा धोका कमी होतो. तरीही 'नीट' अजूनही कागद-पेन पद्धतीने घेतली जाते.

जेईई-मेनसारखी परीक्षा संगणकाधारित होऊ शकते, तर 'नीट'साठी ती शक्य का नाही, याचे स्पष्ट उत्तर प्रशासनाकडे नाही. आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असूनही त्याचा वापर टाळणे, हीच खरी अकलेची काटकसर म्हणावी लागेल. या सर्व गोंधळाचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांनाच बसतो. फेरपरीक्षेची तयारी, मानसिक ताण, प्रवेश प्रक्रियेतील विलंब आणि आर्थिक भार यामुळे त्यांचे नुकसान होते. त्याच वेळी खासगी शिकवणी संस्था या परिस्थितीतही नफा कमावण्याच्या तयारीत असतात. शिक्षणासारख्या संवेदनशील क्षेत्रात अशी बेफिकिरी अत्यंत धोकादायक आहे. 'एनटीए' परीक्षा शुल्कातून कोट्यवधी रुपये गोळा करते.

तरी सुरक्षित आणि पारदर्शक परीक्षा घेण्यात वारंवार अपयश येत असेल, तर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. केवळ चौकशी समित्या आणि मोठी आश्वासने पुरेशी नाहीत. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, कठोर सुरक्षा आणि पारदर्शक व्यवस्था उभारल्याशिवाय विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा मिळवता येणार नाही.

## प्रासंगिक »

### सत्य

**पांडुरंगरावांना तीन मुली होत्या. त्या सुंदर, गुणी आणि गृहकर्तव्यदक्ष होत्या; पण तिघीही बोबड्या बोलत असत. मुलींचे लग्न कसे होणार, ही चिंता पांडुरंगरावांना सतावत होती.**

एकदा मुलींना पाहण्यासाठी वरपक्ष येणार असल्याने त्यांनी मुलींना स्पष्ट सांगितले की, "कोणीही बोलायचे नाही." पाहुणे आले.

चहा-फराळ झाला. पदार्थांची चव घेऊन एक गृहस्थ म्हणाले, "वा! पदार्थ खूप छान झालेत. कोणी केले?" हे ऐकून मोठी मुलगी म्हणाली, "आईने केये नाईट, आमीट केये."

तिचे बोलणे ऐकताच दुसरी मुलगी तिला रागाने म्हणाली, "बाबांनी बोलू नका म्हंटलं होतं ना!" त्यावर तिसरी म्हणाली, "ही बोबयी, तू पण बोबयी; पण मीच नाही बोबयी!" तिघींचे संभाषण ऐकून वरपक्षाला सत्य समजले.

त्यांनी शांतपणे तिथून काढता पाय घेतला. पांडुरंगरावांची मात्र मोठी पंचाईत झाली.

- तात्पर्य : सत्य कितीही लपवण्याचा प्रयत्न केला तरी ते कधी ना कधी उघड होतेच.

भारतीय संस्कृतीत सोन्याला केवळ दागिना म्हणून नव्हे, तर सुरक्षितता, प्रतिष्ठा आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. लग्नकार्य, सण-उत्सव किंवा आर्थिक अडचणीच्या काळात भारतीयांची पहिली पसंती सोन्यालाच असते.

# सोने घ्यावे की न घ्यावे? निर्णय घेण्याची वेळ आली आहे



मात्र, आज देशासमोर उभ्या असलेल्या आर्थिक परिस्थितीत हेच सोन्याचे आकर्षण अर्थव्यवस्थेसाठी चिंतेचा विषय बनले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना पुढील एक वर्ष सोने खरेदी टाळण्याचे केलेले आवाहन याच पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरते. भारत हा जगातील सर्वाधिक सोने आयात करणाऱ्या देशांपैकी एक आहे. २०२५-२६ मध्ये सोन्याची आयात तब्बल ७२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली. यामुळे देशाच्या परकीय चलन साठ्यावर मोठा ताण येत आहे. सध्या पश्चिम आशियातील अस्थिरतेमुळे खनिज तेलाचे दर आधीच वाढलेले आहेत. अशा वेळी सोन्याच्या आयातीवर खर्च होणारे डॉलर वाचवणे हे राष्ट्रहिताचे ठरते. अन्यथा चालू खात्यावरील तूट वाढून रुपयाचे मूल्य आणखी घसरण्याची शक्यता आहे.

मात्र, या प्रश्नाची दुसरी बाजूही दुर्लक्षित करता येणार नाही. देशातील ज्वेलरी उद्योगावर थेट आणि अप्रत्यक्षपणे एक कोटीहून अधिक लोकांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. जर सोने खरेदी मोठ्या प्रमाणात घटली, तर या उद्योगावर गंभीर परिणाम होऊ शकतो. दागिने व्यवसायाची उलाढाल कमी झाल्यास लाखो कारागीर, दुकानदार आणि कामगार आर्थिक संकटात सापडतील. त्यामुळे राष्ट्रहित आणि रोजगार यामध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे. सोन्यातील गुंतवणूक ही सुरक्षित मानली जात असली, तरी ती अर्थव्यवस्थेसाठी फारशी उत्पादक ठरत नाही. लॉकरमध्ये पडून असलेले सोने उद्योग, रोजगार किंवा उत्पादन वाढविण्यात योगदान देत नाही. त्यामुळे सरकारने 'सॉव्हेरिन गोल्ड बॉंड'सारख्या पर्यायांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. यात गुंतवणूकदाराला सोन्याच्या किमतीतील वाढीचा लाभ मिळतो आणि देशालाही प्रत्यक्ष सोने आयात करण्याची आवश्यकता राहत नाही.

आजची परिस्थिती केवळ वैयक्तिक फायद्याचा विचार करण्याची नाही, तर देशाच्या आर्थिक स्थैर्याला प्राधान्य देण्याची आहे. सोन्यावरील प्रेम कायम राहीलच; मात्र सध्या देशाच्या परकीय चलन साठ्याचे संरक्षण करणे अधिक महत्त्वाचे आहे. स्वतःचे लॉकर भरायचे की देशाची तिजोरी मजबूत करायची, याचा निर्णय आता जनतेलाच घ्यावा लागणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा ।
म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥

रात्रंदिस मज पाहिजे जवळी ।
क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नीटची परीक्षाच रद्दच करा!

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची मागणी

महाईन्यूज । मुंबई

**देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणारी नीट परीक्षाच रद्द करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे. ठाकरे यांनी सरकारमधील मंत्र्यांना पण विनंती करताना जरा पाठीचा कणा ताठ दाखवून दक्षिणेतील राज्यांच्या आवाजात आपला आवाज मिसळा असे आवाहन केले आहे.**



राज ठाकरे समाज माध्यमाच्या माध्यमातून केंद्र सरकारवर टीका केली आहे. हे 'NEET' वैगरे काही नको आपल्याला. आपल्याला आपल्या राज्यातील मुलांशी घेणंदेणं आहे. महाराष्ट्रातील मेडिकल कॉलेजेसमध्ये मराठी मुलांनाच प्रवेश मिळणार नसेल तर उपयोग काय तुमचा असा सवालही त्यांनी केला आहे.

केंद्र सरकारची प्रत्येक विषयात गोंधळ घालून लोकांना वेठीस धरण्याची परंपरा सुरूच आहे. 'NEET' पेपरफुटीने परत एकदा हे सिद्ध झालं. 'NEET' चा पेपर १० लाख रुपयांना विकत घेतला गेला. आणि याची मुळं सापडली महाराष्ट्रात. अर्थात हे पेपरफुटीचं जाळं देशव्यापी आहे. यांत 'NEET' साठी तयार करून घेणाऱ्या कोचिंग क्लासेसचा पण हात आहे.

हे सगळं झाल्यावर केंद्र सरकारने काय केलं तर परीक्षा रद्द केली आणि सीबीआय चौकशी लावली. या आधी पण २०२४ ला सीबीआय चौकशी अशाच एका प्रकरणात लावली होती त्यातून काही साध्य झालं नाही. या सगळ्यात आपण आपलं काम केलं असा सरकारचा आविर्भाव आहे. पण २२ लाख मुलांचं आणि त्यांच्या कुटुंबीयांचं आयुष्य टांगणीला लागलं त्याचं काय ?

मुळात २०१६ ला 'NEET' लादण्याची गरजच नव्हती. पण सगळं एकछत्री अंमलाखाली आणण्याची या सरकारची खुमखुमी इतकी तीव्र आहे की मग काही लाख लोकांच्या आयुष्याचा खेळखंडोबा झाला तर काय फरक पडतो ? 'NEET' बद्दल मी २०१६ पासून आक्षेप नोंदवत होतो. या परीक्षांमुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचं नुकसान होणार आणि जे आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत, ते महागडे कोचिंग क्लासेस लावणार. पुढे हे क्लासवाले आर्थिक शक्तीच्या जोरावर परीक्षांचे निकाल हवे तसे वाकवणार हे मला दिसत होतं आणि सामान्य घरातील मुलं,मुली भरडली जाणार हे मला दिसत होतं आणि म्हणून २०१६ पासून आम्ही याला विरोध करतोय.

माझ्या सारखाच विरोध दक्षिणेतील नेत्यांनी पण केला. सध्याचे तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री विजय पण 'NEET' रद्द करा म्हणून आग्रह धरत आहेत. कारण दक्षिणेतील ५ राज्य आणि महाराष्ट्र मिळून जवळपास ३५० च्या वर मेडिकल कॉलेजेस आहेत आणि वरती उत्तरेतली मोठ्या राज्यांमध्ये फक्त १८० मेडिकल कॉलेजेस आहेत. त्यामुळे उत्तरेतील विद्यार्थी दक्षिणेत घुसवण्यासाठी हा सगळा अट्टाहास २०१६ पासून सुरु आहे. आणि त्यासाठी कोचिंग क्लासेसचं सगळ्यात मोठं जाळं उत्तरेतल्या राज्यांत आहे. आणि व्यवस्था कशी वाकवायची हे त्यांना नीट माहित आहे. प्रश्न इतकाच आहे की अशा सडलेल्या व्यवस्थेतून जे डॉक्टर्स बाहेर पडतील त्यांच्या हातात आपण आपलं आरोग्य देणार आहोत का ? आणि का तर केंद्राला वाटलं की यापुढे मेडिकल प्रवेशासाठी एकच परीक्षा हवी म्हणून ?

आधी प्रत्येक राज्याची एक परीक्षा होती, त्याच्या आधी तर बारावीच्या मार्कांवर प्रवेश मिळायचा. समजा त्यात काही त्रुटी होत्या असं मान्य करू, मग त्या सुधारायच्या सोडून जी 'NEET' परीक्षा आणली ती अजून भीषण निघाली. या परीक्षेत कधी काही विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाल्याची उदाहरणं आहेत जे अशक्य वाटतं, कधी परस्पर ग्रेस मार्क्स दिलेत. थोडक्यात काय ज्याच्याकडे व्यवस्था वाकवायची शक्ती आहे त्याला पायघड्या घातल्या जाणार. सध्याचं सरकारचं बरं आहे की आमच्यासोबत आलात की तुम्ही स्वच्छ आणि आमच्या व्यवस्थेला एकदा शांत केलंत की मग तुम्ही काहीही करा.

प्रश्न असा आहे की मुळात मेडिकलच्या जागा कमी. त्यासाठी राष्ट्रव्यापी परीक्षा. तिचं काय होईल माहित नाही. दरवर्षी काहीतरी नवीन खेळ. काही वर्षांपूर्वी 'NEET' परीक्षेच्या गोंधळावर मी थेट पंतप्रधानांशी बोललो होतो, तेंव्हा प्रश्न सुटला. पण कायमस्वरूपी काही सुधारणा नाही.

बरं इतकी वर्ष एकच माणूस श्री. धर्मेंद्र प्रधान हे केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणून चिकटून बसलेत. त्यांच्या काळात 'NEET' मध्ये इतके घोळ झाले, पण तरीही हे महाशय तिथेच बसलेत. बहुदा हिंदी देशभर लादण्याचा अजेंडा ते नेटाने राबवत आहेत म्हणून त्यांना ही बक्षिसी दिली आहे का ? माझी पंतप्रधानांना विनंती आहे की २२ लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी अनेकदा खेळ करणाऱ्या तुमच्या या मंत्र्यांचा तात्काळ राजीनामा घ्या.

माझी महाराष्ट्र सरकारमधील मंत्र्यांना पण विनंती आहे की जरा पाठीचा कणा ताठ दाखवून दक्षिणेतील राज्यांच्या आवाजात आपला आवाज मिसळा. हे 'NEET' वैगरे काही नको आपल्याला. आपल्याला आपल्या राज्यातील मुलांशी घेणंदेणं आहे. महाराष्ट्रातील मेडिकल कॉलेजेसमध्ये मराठी मुलांनाच प्रवेश मिळणार नसेल तर उपयोग काय तुमचा? सध्या पेट्रोल डिझेल वाचवतोय हे दाखवण्याचा जो संपूर्ण सरकारचा इव्हेन्ट सुरु आहे त्यातून बाहेर या. तुम्ही जे हे सगळं करत आहात हे एक दिवसाचं आणि एका फोटोपुरतं आहे हे सगळ्यांना माहीत आहे. त्यापेक्षा मेडिकल प्रवेश परीक्षेबद्दल बोला आणि काहीतरी ठाम ( ठाम म्हणजे राज्याच्या हिताची, नाही तर केंद्र जे सांगेल त्याला रेटून हो म्हणणं याला ठाम भूमिका म्हणतील) भूमिका घ्या अशी मागणीही त्यांनी केली.

# बिनविरोध निवडून आलेल्या १० विधानपरिषद सदस्यांनी घेतली शपथ

महाईन्यूज । मुंबई

**विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीत ९ आणि पोटनिवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या १ अशा १० नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सोहळा आज विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात दिमाखात पार पडला. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या सर्व नवनियुक्त आमदारांना सदस्यत्वाची शपथ दिली. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील महत्त्वाचे सदस्य उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दीकी यांनी इंग्रजीमधून आमदारकीची शपथ घेतली.**



## पक्षनिहाय शपथ घेणाऱ्या सदस्यांची यादी

- भारतीय जनता पार्टी (भाजप): प्रमोद जठार, सुनील कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रज्ञा सातव (पोटनिवडणूक).
- शिवसेना (एकनाथ शिंदे गट): डॉ. नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू.
- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट): अंबादास दानवे.
- राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): झिशान सिद्दिकी.

विधान परिषदेच्या एकूण १० जागांसाठी ही निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली होती. यामध्ये ९ जागांसाठी नियमित निवडणूक, तर एका जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली होती. १२ मे २०२६ रोजी मतदान होणार होते, मात्र १० जागांसाठी केवळ १० उमेदवारांचेच अर्ज आल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली. यामध्ये भाजपचे संख्याबळ अधिक असल्याने त्यांच्या वाट्याला सर्वाधिक ६ जागा आल्या, तर शिंदे गटाने २ आणि अजित पवार गट व ठाकरे गटाला प्रत्येकी १ जागा मिळाली आहे. या निवडीमध्ये विधानसभेतील सध्याच्या पक्षीय बलाबलानुसार जागांचे वाटप झाले आहे. सध्या विधानसभेत भाजपचे १३१, शिवसेना (शिंदे गट) ५७, तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) ४० सदस्य आहेत. विरोधी पक्षात शिवसेना (ठाकरे गट) कडे २०, काँग्रेसकडे १६ आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) कडे १० सदस्य आहेत. यासोबतच समाजवादी पार्टी २, जनसुराज्य शक्ती २, राष्ट्रीय युवा स्वाभीमान पार्टी १, राष्ट्रीय समाज पक्ष-रासप १, एमआयएम १ जागा, सीपीआय (एम) १, पिजन्ट्स अँड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया- पीडब्ल्यूपीआय १, राजर्षी शाहू विकास आघाडी १ आणि २ अपक्ष आमदार.

# इराणच्या अण्वस्त्रांना चीनचाही विरोध

## ‘होर्मुझ सामुद्रधुनी’ खुली ठेवण्यावर दोन्ही महासत्तांचे एकमत

महाईन्यूज । बीजिंग

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चीनच्या दौऱ्यावर आहेत. ट्रम्प आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात इराण युद्ध आणि होर्मुझ सामुद्रधुनीबाबत महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत होर्मुझ सामुद्रधुनी कोणत्याही अडथळ्याशिवाय पूर्णपणे खुली करण्यात यावी या मुद्यावर दोन्ही देशांनी भर दिला. तसेच, इराणकडे कधीही अण्वस्त्रं असू नयेत, याला चीनने देखील समर्थन दिले.**





डोनाल्ड ट्रम्प आणि शी जिनपिंग यांच्यात झालेल्या चर्चेची माहिती व्हाईट हाऊसकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. ट्रम्प आणि जिनपिंग यांच्यात अत्यंत सकारात्मक बैठक पार पडली. यावेळी दोघांमध्ये दोन्ही देशांतील आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या विविध मार्गांवर चर्चा केली. अमेरिकी व्यवसायांना चिनी बाजारपेठेत अधिक संधी उपलब्ध करून देणे, अमेरिकेतील उद्योगांमध्ये चिनी गुंतवणूक वाढवणे याबाबत देखील सविस्तर चर्चा झाल्याची माहिती देण्यात आली. बैठकीच्या एका सत्रात अमेरिकेतील अनेक बड्या कंपन्यांचे प्रमुख देखील सहभागी झाले होते.

व्हाईट हाऊसच्या प्रसिद्धी पत्रकात दिलेल्या माहितीनुसार, होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याबाबत चर्चा झाली. ऊर्जा वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी ही सामुद्रधुनी खुली राहणे आवश्यक आहे, यावर दोन्ही देशांचे एकमत झाले. तसेच, होर्मुझमध्ये लष्करी बळाचा वापर करणे आणि तिथं कोणत्याही प्रकारचे शुल्क आकरणी करणे चुकीचे असल्याचे मत जिनपिंग यांनी व्यक्त केले. दरम्यान, भविष्यात होर्मुझ सामुद्रधुनीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अमेरिकेकडून अधिक तेल खरेदी करण्याची इच्छाही चीनने व्यक्त केल्याचा दावा अमेरिकेने केला आहे.

### इराणकडे अण्वस्त्रं असू नये यासाठी चीनची सहमती

दोन्ही राष्ट्राध्यक्षांनी अमली पदार्थांचे घटक अमेरिकेत येण्यापासून रोखण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. याशिवाय चीनने अमेरिकन कृषी उत्पादनांच्या खरेदीत वाढ करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाबाबत अमेरिकेच्या भूमिकेर देखील बैठकीत चर्चा झाली. इराणकडे कधीही अण्वस्त्रं असू नयेत यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली, असे व्हाईट हाऊसने म्हटले आहे.

## दिल्ली पुन्हा हादरली! कामावरून परतणाऱ्या महिलेवर बसमध्ये सामूहिक बलात्कार

महाईन्यूज । नवी दिल्ली

**राजधानी दिल्लीत मंगळवारी घडलेल्या एका घटनेमुळे पुन्हा एकदा २०१२ साली घडलेल्या निर्भया बलात्कार प्रकरणाच्या भीषण आठवणी ताज्या झाल्या. कामावरून परतणाऱ्या एका महिलेला जबरदस्तीने बसमध्ये नेऊन तिच्यावर बसचा ड्रायव्हर व कंडक्टर यांनी बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.**




यासंदर्भात पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला असून संबंधित ड्रायव्हर व कंडक्टरला अटक केली आहे. या प्रकरणाचा सविस्तर तपास दिल्ली पोलीस करत आहेत. बसच्या फॉरेन्सिक रिपोर्टचादेखील आरोपपत्रात समावेश करण्यात येणार असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे.

सदर घटना ही १२ मे रोजी घडली. पोलिसांकडून यासंदर्भात गुरुवारी माहिती मिळाली असून या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारानंतर पीडित महिलेनं थेट राणीबाग पोलीस स्थानकात आरोपींविरोधात तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणी भारतीय न्याय संहितेतील कलम ६४(१) बलात्कार, कलम ७० (१) सामूहिक बलत्कार यानुसार गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींना तात्काळ अटक करण्यात आल्याचंदेखील पोलिसांनी सांगितलं.

चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार, सदर बसच्या काचांवर काळ्या रंगाचे पेपर्स चिकटवण्यात आले होते. तसेच, या बसमधून आणीबाणीच्या प्रसंगी बाहेर पडण्यासाठी पर्यायी मार्गदेखील नव्हते, अशीही माहिती समोर आली आहे.

### नेमकं काय घडलं?

दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, पीडित महिला १२ मे रोजी कामावरून घरी परतत असताना हा गुन्हा घडला. दिल्लीतील सरस्वती विहार परिसरातील बी-ब्लॉग बसस्टँडजवळ ती पोहोचली असता एका आरोपीला महिलेनं वेळ काय झाली असं विचारलं. हा आरोपी यावेळी गुन्हा घडला त्याच बसशेजारी उभा होता. परिस्थितीचा गैरफायदा घेत आरोपीनं पीडित महिलेला जबरदस्तीने बसमध्ये खेचलं. बसमध्येच दोन्ही आरोपींनी महिलेवर बलात्कार केला. यानंतर आरोपींनी महिलेला बसमधून बाहेर ढकलून दिलं आणि घटनास्थळावरून ते निघून गेले. पीडित महिलेची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर तिचा जबाब नोंदवण्यात आला. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पार पडल्यानंतर आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात आली. सध्या दोन्ही आरोपी पोलीसांच्या ताब्यात असून त्यांची चौकशी केली जात आहे. सदर बस बंद अवस्थेत होती की प्रवासी वाहतुकीसाठी वापरली जात होती? गुन्हा घडला तेव्हा बसमध्ये इतरही कुणी प्रवासी होते का? अशा बाबींचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.



# बॉबी देओलचा रेट्रो लूक



आयुष्याच्या पहिल्या इनिंगपेक्षा दुसरी इनिंग भन्नाट खेळत असलेल्या बॉबी देओलच्या आगामी 'बंदर' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आहे. एक मिनिट २९ सेकंदांच्या टीझरमध्ये बॉबी देओल समर नावाच्या एका अभिनेत्याच्या भूमिकेत दिसत आहे, जो आपली ओळख गमावत आहे आणि ज्याचे आयुष्य एका केसमुळे कायमचे बदलून जाते. टीझरची सुरुवात सत्तरच्या दशकातील डिस्को अवतारातून पुन्हा तयार केलेल्या रेट्रो स्टाइल गाण्याने 'कम ऑन बेबी, दिल किसको देगी' ने होते. यानंतर बॉबी देओलच्या भूमिकेची ओळख करून दिली जाते. बॉबीने समर नावाच्या एका अभिनेत्याची भूमिका साकारली आहे, जो एकेकाळी स्टार होता आणि आता आपली ओळख टिकवण्यासाठी संघर्ष करत आहे.

# अनुष्का शर्मा पुन्हा स्क्रीनवर

अभिनेत्री अनुष्का शर्मा लग्नानंतर अभिनय क्षेत्रापासून दूर गेली. सध्या ती पती विराट कोहली आणि तिच्या दोन मुलांसह लंडनमध्ये वास्तव्यास आहे. मात्र ती सोशल मिडियावर सक्रिय असल्याचे असते. नुकतेच तिने केलेल्या पोस्टमुळे ती जाहिरातीमध्ये दिसणार असल्याचे दिसत आहे. अनुष्काच्या कमबॅकची चाहत्यांना खूप दिवसांपासून प्रतीक्षा होती. त्यामुळे तिला पुन्हा स्क्रीनवर पाहून चाहतेही खूप आनंदी झाले आहेत. अनुष्का बऱ्याच काळापासून स्क्रीनपासून दूर आहेत. मात्र आता ती एका ज्वेलरी ब्रँडच्या जाहिरातीत दिसली आहे. तिने या जाहिरातीचा व्हिडीओ तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर शेअर केला आहे. यातील तिच्या बदललेल्या लुकची चांगलीच चर्चा रंगली आहे. यावर संमिश्र प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली आहे. अनेक नेटकऱ्यांना अनुष्का शर्माचा लूक आधीपेक्षा खूप बदललेला वाटत असल्याचे म्हटलं आहे. तिच्या बदललेल्या रूपामागचं कारण मेकअप, लाईटिंग, वाढतं वय, एडिटिंग किंवा कॉस्मेटिक प्रक्रिया असल्याचा अंदाज अनेकांनी व्यक्त केला आहे. मात्र काहींना तिचा हा लुक पसंतीस पडला आहे. दरम्यान, अनुष्का शेवटची 2018 मध्ये प्रदर्शित झालेल्या 'झिरो' चित्रपटात दिसली होती. यानंतर तिने 'चकदा एक्स्प्रेस' चित्रपटाचे शूटिंग पूर्ण काम केलं. मात्र काही मतभेदांमुळे हा चित्रपट अद्याप प्रदर्शित झालेला नाही. त्यानंतर आता अनेक वर्षानंतर ती नव्या जाहिरातीद्वारे प्रेक्षकांच्या समोर आली आहे.





# दिशाची हॉलिवूडमध्ये एन्ट्री!

बॉलिवूडमधील काही कलाकारांना हॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळते. अशीच एक संधी अभिनेत्री दिशा पटानीला मिळाली आहे. अभिनेत्री दिशा पटानी एका हॉलिवूड चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटाचे नाव 'द पोर्टल ऑफ फोर्स' असून, हा एक ॲक्शन-थ्रिलर चित्रपट आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून, दिशाची झलक ट्रेलरमधून दाखवण्यात आली आहे. या चित्रपटात हॉलिवूडमधील केविन स्पेसी, टायरेस गिब्सन आणि डॉल्फ लुंडग्रेन यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत. लाडो ओखोटनिकोव्ह यांनी तयार केलेल्या 'स्टॅंटिगाईस व्हर्सेस हॉलिगाईस' या नवीन सिनेमॅटिक युनिव्हर्समधील हा पहिला भाग आहे. या चित्रपटात दिशाने जेसिकाची भूमिका साकारली आहे, जी स्टॅंटिगाईस आणि हॉलिगाईस या दोन प्राचीन गटांमध्ये अडकलेली आहे. दोन गटांमधील दीर्घकाळ चाललेल्या संघर्षाभोवती चित्रपटातील कथा फिरते, ज्यात जेसिकाला 'द चोझन वन' (निवडलेली व्यक्ती) म्हणून चित्रित केलेले आहे. चित्रपटाच्या मूळ कथानकानुसार, जेसिका युद्धाचे तसेच मानवतेचे भवितव्य ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. केविन स्पेसी दिग्दर्शित हा चित्रपट दोन दशकांहून अधिक काळानंतर दिग्दर्शनात त्यांचे पुनरागमन दर्शवतो. चित्रपट निर्मात्यांच्या मते हा दोन विरोधी प्राचीन शक्तींमधील एका गुप्त युद्धावर आधारित एक ॲक्शन-थ्रिलर चित्रपट आहे. दिशा पटानी बॉलिवूडमधील एक प्रसिद्ध अभिनेत्री असून, अनेक चित्रपटात ती ॲक्शन करताना दिसली आहे. हॉलिवूड चित्रपटात ती दिसणार असल्याने तिच्या चाहत्यांना मोठी उत्सुकला लागलेली आहे. 'द पोर्टल ऑफ फोर्स' चित्रपटाचा ट्रेलर समोर आला असला तरी चित्रपटाची रिलीज डेट जाहीर करण्यात आलेली नाही. मात्र, ट्रेलरच्या शेवटी कमिंग सुन २०२६ असे लिहिलेले दिसते. त्यामुळे हा चित्रपट याच वर्षी रिलीज होईल अशी शक्यता आहे. दरम्यान, 'द पोर्टल ऑफ फोर्स' हॉलिवूड चित्रपटांची दारं खुली करणार चित्रपट ठरू शकतो. हे तिचे हॉलिवूडमधील पदार्पण समजले जाते. याशिवाय दिशा आगामी बॉलिवूड चित्रपट "अवारापन २" मध्येही दिसणार आहे.



# 'ट्रॅप शूटर' झोरावरला डच्चू

## या वर्षीच्या आशियाई खेळांसाठीच्या संघातून वगळले

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आशियातील अव्वल आणि जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेला 'ट्रॅप' नेमबाज झोरावर सिंग संधूला या वर्षीच्या आशियाई खेळांसाठीच्या भारताच्या प्रस्तावित 'शॉटगन' संघातून वगळण्यात आले आहे. हा अनुभवी नेमबाज देशातील सर्वोत्तम नेमबाजांपैकी एक असून त्याने गेल्या वर्षी प्रतिष्ठित जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदकही पटकावले होते. असे असूनही त्याच्यावर ही वेळ आली आहे.**



राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा आणि देशांतर्गत निवड चाचण्यांदरम्यान झोरावरच्या कामगिरीत काहीशी घसरण झाली होती. जागतिक अजिंक्यपद स्पर्धा आणि विश्वचषक अंतिम फेरी यासारख्या अत्यंत व्यस्त आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या वेळापत्रकातही त्याला या देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागी होणे भाग पडले होते. परिणामी देशांतर्गत स्तरावर त्याला आपल्या कामगिरीचा सर्वोच्च टप्पा गाठणे शक्य झाले नाही. राष्ट्रीय निवड चाचण्यांमधील त्या निराशाजनक गुणांमुळेच त्याला अखेर आशियाई खेळांसाठीच्या संघातील स्थान गमवावे लागले आहे.

विशेष म्हणजे अवघ्या एका महिन्यापूर्वीच तो जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर होता. झोरावरने 'नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया'ला आपल्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची विनंती केली आहे. गेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत भारतीय 'ट्रॅप' नेमबाजांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वोत्तम गुणांची नोंद आपल्याच नावावर असल्याचे त्याने निदर्शनास आणून दिले आहे. तथापि महासंघाने आपण एका वर्षापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या निवड धोरणाचेच काटेकोरपणे पालन करू, अशी आपली भूमिका कायम ठेवली आहे.



# चेन्नईच्या दुखापतींचं सत्र थांबेना! प्लेऑफ सुरु होण्याआधी प्रमुख खेळाडू घरी परतला

**महाईन्यूज । चेन्नई**

**आयपीएल २०२६ स्पर्धा सध्या निर्णायक टप्प्यावर आहे. लवकरच प्लेऑफमध्ये जाणारे ४ संघ कोण? हे चित्र स्पष्ट होणार आहे. चेन्नई सुपर किंग्स संघाकडेही प्लेऑफमध्ये जाण्याची संधी असणार आहे. त्यासाठी चेन्नईला इथून पुढील सामन्यांमध्ये विजय मिळवणं गरजेचं असणार आहे. त्याआधी चेन्नई सुपर किंग्स संघाला मोठा धक्का बसला आहे.**



आयपीएल २०२६ स्पर्धा संपत आली, पण चेन्नई सुपर किंग्स संघाचं दुखापतीचं सत्र काही थांबायचं नाव घेत नाहीये. स्पर्धेच्या सुरुवातीलाच एमएस धोनी दुखापतग्रस्त झाला होता, तो अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यानंतर स्टार फलंदाज आयुष म्हात्रे दुखापतग्रस्त होऊन, संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला. आता चेन्नईचा संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याच्या उंबरठ्यावर असताना, संघातील प्रमुख गोलंदाजाला दुखापतग्रस्त झाल्यामुळे मायदेशी परतावं लागलं आहे.

चेन्नई सुपर किंग्स संघाला या हंगामात नावाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. जर चेन्नईला प्लेऑफमध्ये स्थन मिळवायचं असेल, तर पुढील ३ पैकी २ सामन्यांमध्ये विजय मिळवणं गरजेचं असणार आहे. दरम्यान वेगवान गोलंदाज जेमी ओव्हरटन दुखापतग्रस्त झाला असून मायदेशी परतला आहे. त्यामुळे तो पुढील सामन्यांमध्ये खेळताना दिसून येणार नाही. स्पर्धेच्या निर्णायक टप्प्यावर जेमी ओव्हरटनसारखा अनुभवी गोलंदाज संघाबाहेर होणं, हा चेन्नई सुपर किंग्सला बसणारा सर्वात मोठा धक्का आहे.

जेमी ओव्हरटनने या हंगामातील १० सामन्यांमध्ये गोलंदाजी करताना आतापर्यंत १४ गडी बाद केले आहेत. त्याने विकेट्स तर काढून दिल्या आहेत, पण यादरम्यान तो महागडा ठरला असून त्याने ८.८९ च्या सरासरीने धावा खर्च करुन दिल्या आहेत. गोलंदाजीसह त्याने फलंदाजीतही मोलाचं योगदान दिलं आहे. धोनी एकही सामना खेळू शकलेला नाही. त्यामुळे धोनीच्या जागी अशा एका खेळाडूची गरज होती, जो शेवटी येऊन मोठे फटके खेळू शकतो.

### जेमीने धोनीची जागा भरून काढली

ही जागा जेमी ओव्हरटनने भरून काढली आहे. त्यामुळे त्याला क्रिकेट चाहत्यांनी परदेशी थाला म्हणजेच धोनीचा उत्तराधिकारी असं नाव दिलं होतं. चेन्नई सुपर किंग्सने अधिकृतरित्या जाहीर केलं आहे की, तो दुखापतीवर उपचार घेण्यासाठी मायदेशी परतला आहे. यावरुन हे स्पष्ट आहे की,तो प्लेऑफच्या सामन्यांसाठीही परतण्याची शक्यता कमी आहे. आता उर्वरित सामन्यांमध्ये चेन्नईसमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. संघातील अनुभवी खेळाडू सतत दुखापतग्रस्त होत असल्यामुळे संघाचा समतोल बिघडलेला दिसून येतोय.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 15 मे 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# मोशीत मोरे यांची निर्घृण हत्या; शहरात खळबळ

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**आरपीआय कामगार आघाडी महाराष्ट्राचे अध्यक्ष अनिल मोरे यांची मोशी परिसरात धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना रात्री घडली. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरात खळबळ उडाली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, मोशी येथील युवराज रेस्टॉरंट अँड बार येथे रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास अनिल मोरे यांच्यावर अज्ञात आरोपींनी धारदार शस्त्राने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात आरपीआय कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती.

दरम्यान, अनिल मोरे यांच्या पार्थिवावर यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे शवविच्छेदन करण्यात आले. "जोपर्यंत मारेकऱ्यांना अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही," असा इशारा आरपीआय कामगार आघाडीच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुरावे तपासले जात असून आरोपींचा शोध सुरू आहे.

### हत्याकांड; शहरात तणाव, आरोपी अद्याप फरार

मोशी परिसरात आरपीआय कामगार आघाडीचे अध्यक्ष अनिल मोरे यांची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या झाल्याने पिंपरी-चिंचवड शहरात खळबळ उडाली आहे. रात्रीच्या वेळी रेस्टॉरंटसमोर झालेल्या या हल्ल्यानंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते जमा झाले. पोलिसांनी गुन्हा नोंद करून सीसीटीव्ही फुटेज व अन्य पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला आहे. दरम्यान, मारेकऱ्यांना अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा कार्यकर्त्यांनी इशारा दिल्याने परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे.






# स्थायी समितीत पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य व सुरक्षेसह विविध प्रस्तावांना मंजुरी

## पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासकामांना गती : सभापती अभिषेक बारणे

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या पायाभूत सुविधा आणि नागरिकाभिमुख विविध महत्त्वाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते दुरुस्ती, आरोग्य, शिक्षण, सुरक्षा, सार्वजनिक सुविधा आणि विकासकामांशी संबंधित निर्णयांमुळे शहरातील मूलभूत सेवा अधिक सक्षम होणार आहेत.**




महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी विविध भागांतील जुन्या पाइपलाइन बदलून नवीन पाइपलाइन टाकण्यास मंजुरी देण्यात आली. बिजलीनगर, बळवंतनगर, रस्टन कॉलनी, दापोडी, नवी सांगवी आणि जुनी सांगवी परिसरातील कामांना हिरवा कंदील मिळाला आहे. यासोबतच सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रात आधुनिक ऑटो-क्लोरीनेशन सिस्टीम बसविणे, निगडी व चिखली जलशुद्धीकरण केंद्रांसाठी क्लोरीन गॅस आणि आवश्यक रसायनांची खरेदी यांनाही मंजुरी देण्यात आली. थेरगाव, रहाटणी, पिंपरी, मिलिंदनगर, कैलासनगर, वैभवनगर आणि महात्मा गांधी नगर परिसरातील जलनिस्सारण सुधारणा, नवीन नलिका टाकणे आणि देखभाल-दुरुस्तीच्या कामांनाही स्थायी समितीने मान्यता दिली.

### सार्वजनिक सुविधांच्या विकासाला चालना

वाकड, पुनावळे, ताथवडे परिसरातील नव्याने ताब्यात येणारे रस्ते विकसित करण्यास तसेच पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरुस्ती व नवीन लाईन टाकण्यास मंजुरी देण्यात आली. पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, थेरगाव, बेलठिकानगर आणि रहाटणी परिसरातील रस्ते व फुटपाथ दुरुस्तीची कामेही हाती घेण्यात येणार आहेत. धावडेवस्ती, गुळवेवस्ती, भगतवस्ती, चक्रपाणी वसाहत, सद्गुरूनगर, महादेवनगर आणि लांडगेवस्ती भागातील रस्त्यांचे ऑटोमेटेड सर्वेक्षणानुसार डांबरीकरण व दुरुस्ती करण्यात येणार आहे. काळेवाडी येथील ज्योतिबा गार्डनमध्ये कुस्तीचा आखाडा उभारण्यास तसेच पिंपळे निलख येथे महिला बाजार हट केंद्र उभारणीस मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या मोकळ्या जागांचे काँक्रीटीकरण आणि इंटरलॉकिंग ब्लॉक बसविण्याच्याही कामांना मंजुरी मिळाली.

> “शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याच्या दृष्टीने स्थायी समिती सभेत पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते दुरुस्ती, आरोग्य, शिक्षण, सुरक्षा तसेच मेट्रोसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांशी संबंधित विविध विषयांना मान्यता देण्यात आली आहे. नागरिकांना अधिक दर्जेदार आणि सक्षम नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच शहराच्या वाढत्या गरजांनुसार विकासकामे वेळेत पूर्ण करणे यावर महापालिकेचा भर राहणार आहे. विकासकामांमध्ये सुसूत्रता, पारदर्शकता आणि गुणवत्तेला प्राधान्य देत शहराच्या सर्व भागांमध्ये मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे.”
>
> \- अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

### सुरक्षा व्यवस्थेलाही बळ

महापालिकेच्या ई-लर्निंग प्रकल्पांतर्गत शाळा आणि कार्यालयांसाठी इंटरनेट बँडविड्थ सेवा उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली. जिजामाता रुग्णालयातील स्थापत्य विषयक कामांनाही हिरवा कंदील मिळाला आहे. सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळासोबत नव्याने करार करून २१८ सुरक्षा रक्षकांच्या वेतनासाठी खर्चास मान्यता देण्यात आली. सार्वजनिक शौचालयांच्या साफसफाईसाठी तसेच विविध विभागांतील दैनंदिन देखभाल-दुरुस्तीसाठी आवश्यक मनुष्यबळ पुरविण्यालाही मंजुरी देण्यात आली. नगररचना योजना राबविण्यासाठी सल्लागार संस्थांना मुदतवाढ देणे तसेच विविध प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्यासही मंजुरी देण्यात आली. यामुळे विकासकामांमध्ये सुसूत्रता, पारदर्शकता आणि गुणवत्तेला चालना मिळणार असल्याचे सांगितले.

---

# महापालिका अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या खासगी वाहनांसाठी ५० हजार इंधन भत्ता प्रस्ताव

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेत पदाधिकाऱ्यांना दरमहा ₹५० हजार इंधन भत्ता देण्याच्या प्रस्तावावरून निर्माण झालेल्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळण्याची चिन्हे आहेत. संबंधित प्रस्ताव यापूर्वीपासूनच पुनर्विचाराधीन होता आणि तो अधिकृतरीत्या मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती शहराचे महापौर रवि लांडगे यांनी आपल्या X हॅंडलवर दिली आहे. येत्या १५ मे २०२६ रोजी होणाऱ्या महासभेच्या इतिवृत्तात या निर्णयाची अधिकृत नोंद करण्यात येणार आहे.**



सदर प्रस्तावाबाबत “महाईन्यूज” ने “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनाला महायुतीतील सेना-राष्ट्रवादीच्या नगरसेवकांकडून हरताळ?” या मथळ्याने सडेतोड वृत्त प्रसिद्ध केले होते. पुण्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनीही याबाबत X हॅंडलवर भूमिका मांडली होती. त्याची दखल महापौर कार्यालय आणि प्रशासनाने घेतली आहे. वास्तविक, शिवसेनेच्या नगरसेविका सुलभा उबाळे आणि राष्ट्रवादीचे नगरसेवक संतोष कोकणे यांनी हा प्रस्ताव ठेवला होता. स्थायी समितीने हा प्रस्ताव मुख्य सभेत पाठवला. हा प्रस्ताव अजेंड्यावर होता. याबाबत वृत्तांकन केल्यानंतर महापौरांनी हा प्रस्ताव रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेतील सत्ताधारी आणि प्रशासनाकडून हा निर्णय जनभावना, आर्थिक शिस्त आणि जबाबदार प्रशासन यांचा विचार करून घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे. इंधन भत्ता प्रस्तावावर विरोधकांसह विविध स्तरांतून टीका होत होती. शहरातील विकासकामे, आर्थिक प्राधान्यक्रम आणि सर्वसामान्य नागरिकांवरील वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या भत्त्याची गरज काय, असा सवाल उपस्थित केला जात होता.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री, अधिकारी यांचे परदेश दौरे, महत्त्वाच्या बैठका ऑनलाईन घेणे असे आदेश काढत प्रधानमंत्री मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला होता. त्यानंतर शहराचे महापौर रवि लांडगे यांनीही महत्त्वाचा निर्णय घेत प्रस्तावित बाकू परदेश दौरा रद्द केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, काटकसरीचे धोरण आणि जबाबदार प्रशासन याबाबत केलेल्या आवाहनाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. महापौर रवि लांडगे यांच्या या निर्णयाकडे प्रतीकात्मक आणि जनतेला सकारात्मक संदेश देणारे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. सार्वजनिक पैशांचा वापर अत्यंत जबाबदारीने व्हावा, या भूमिकेतून हा निर्णय घेण्यात आला आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन पारदर्शकता आणि व्यापक जनहित या तत्त्वांशी कटिबद्ध असल्याचेही यावेळी स्पष्ट केले. आगामी काळात नागरिकांच्या अपेक्षा आणि आर्थिक शिस्त यांचा समतोल राखत निर्णय घेतले जातील, असा विश्वासही प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला.

> “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि जबाबदार प्रशासनाबाबत केलेल्या आवाहनाचा आदर राखत आम्ही ५० हजार इंधन भत्ता प्रस्ताव मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, जनतेच्या पैशांचा काटकसरीने व पारदर्शकपणे वापर व्हावा, या भूमिकेतून प्रस्तावित बाकू दौरा रद्द करण्यात आला आहे. नागरिकांचा विश्वास कायम राखणे आणि जनहिताला प्राधान्य देणे हीच आमची भूमिका राहील.”
>
> \- रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड.

# गड-किल्ल्यांच्या नावांनी सजली पिंपरी-चिंचवड शहराची नवी प्रशासन रचना!

## महापालिकेत ८ वरून १० क्षेत्रीय कार्यालये, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या मागणीला यश

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनात मोठा बदल करत विद्यमान ८ प्रभाग समित्यांची पुनर्रचना करून आता १० क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या नव्या क्षेत्रीय कार्यालयांना महाराष्ट्राच्या ऐतिहासिक गड-किल्ल्यांची नावे देण्यात आल्याने प्रशासनाला सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळखीची जोड मिळाली आहे.**



### नव्या क्षेत्रीय कार्यालयांची नावे आणि प्रभाग

| | |
|---|---|
| अ क्षेत्रीय कार्यालय – 'राजगड' (निगडी) | फ क्षेत्रीय कार्यालय – 'तोरणा' (निगडी) |
| ब क्षेत्रीय कार्यालय – 'सिंहगड' (चिंचवडगाव) | ग क्षेत्रीय कार्यालय – 'पुरंदर' (थेरगाव) |
| क क्षेत्रीय कार्यालय – 'विजयदुर्ग' (भोसरी) | ह क्षेत्रीय कार्यालय – 'प्रतापगड' (कासारवाडी) |
| ड क्षेत्रीय कार्यालय – 'देवगिरी' (रहाटणी) | ज क्षेत्रीय कार्यालय – 'रायगड' (ताथवडे) |
| ई क्षेत्रीय कार्यालय – 'शिवनेरी' (भोसरी) | ल क्षेत्रीय कार्यालय – 'लोहगड' (पिंपरी) |

महापालिकेच्या १३ मार्च २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत हा निर्णय मंजूर करण्यात आला होता. नागरिकाभिमुख सेवा अधिक परिणामकारकपणे देणे, प्रशासन सुलभ करणे आणि वाढत्या शहर विस्तारानुसार विभागीय कामकाज सक्षम करणे हा या पुनर्रचनेमागील उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या नव्या रचनेनुसार ३२ निवडणूक प्रभागांचे विभाजन नव्या क्षेत्रीय कार्यालयांमध्ये करण्यात आले असून, हा निर्णय २५ मे २०२६ पासून लागू होणार आहे.

यामध्ये 'राजगड', 'सिंहगड', 'शिवनेरी', 'प्रतापगड', 'रायगड', 'लोहगड' अशा ऐतिहासिक किल्ल्यांची नावे क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आली आहेत. त्यामुळे शहराच्या प्रशासनिक व्यवस्थेत मराठी अस्मिता आणि इतिहासाचा ठसा उमटल्याची भावना व्यक्त होत आहे.

क्षेत्रीय कार्यालयांना गड-किल्ल्यांची नावे देण्याचा प्रस्ताव भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी मांडला होता. त्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या या प्रस्तावाला यश मिळाले असून, नव्या प्रशासनिक रचनेत त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

शहराच्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर प्रशासन अधिक विकेंद्रित करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

> "पिंपरी-चिंचवड शहराचा इतिहास, संस्कृती आणि मराठी अस्मिता जपण्याच्या उद्देशाने क्षेत्रीय कार्यालयांना गड-किल्ल्यांची नावे देण्याचा प्रस्ताव मांडला होता. प्रशासनाने त्यास सकारात्मक प्रतिसाद देत हा निर्णय घेतल्याचा आनंद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची प्रेरणा देणाऱ्या या गड-किल्ल्यांची नावे आता महापालिकेच्या प्रशासनातही कायम स्मरणात राहतील. नागरिकांमध्येही यामुळे ऐतिहासिक अभिमानाची भावना अधिक दृढ होईल.
>
> **- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**

तसेच गड-किल्ल्यांच्या नावांमुळे नागरिकांमध्ये स्थानिक अभिमान आणि ऐतिहासिक जाणीव वाढण्यास मदत होईल, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# पिंपरी-चिंचवड शहरात RMC प्लॅट्सच्या नियमावलीसाठी जनसुनावणी घ्या!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**शहर व उपनगरांमध्ये वाढत्या प्रमाणात सुरू असलेल्या रेडी मिक्स काँक्रीट (RMC) प्लॅट्समुळे होणाऱ्या धुळीच्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने कडक नियमावली (SOP) तयार करावी, तसेच सार्वजनिक जनसुनावणी आयोजित करावी, अशी मागणी पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी फेडरेशनतर्फे करण्यात आली आहे.**




> "पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणावर वाढत असलेल्या RMC प्लॅट्समुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. विशेषतः वाकड, पुनावळे, ताथवडे, किवळे आणि रावेत या भागांमध्ये धुळीचे प्रदूषण चिंताजनकरीत्या वाढले आहे. या प्लॅट्ससाठी स्पष्ट आणि कडक SOP नसल्यामुळे मनमानी कारभार सुरू आहे. त्यामुळे सर्व RMC प्लॅट्सना 'डस्ट-फ्री टेक्नॉलॉजी' बंधनकारक करणे, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि नागरिकांच्या सहभागातून पारदर्शक जनसुनावणी घेणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरण सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत.
>
> **- सचिन लोंढे, पिंपरी-चिंचवड को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी फेडरेशन.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विभागीय आयुक्त, पुणे जिल्हाधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, पीएमआरडीए आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनात शहरातील वाकड, पुनावळे, ताथवडे, किवळे आणि रावेत या झपाट्याने विकसित होणाऱ्या निवासी भागांमध्ये हवेतील धुळीचे प्रमाण धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, RMC प्लॅट्सच्या कार्यपद्धतीत स्पष्ट नियमावलीचा अभाव असल्याने अनेक ठिकाणी मनमानी पद्धतीने कामकाज सुरू आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिक श्वसनाच्या आजारांनी त्रस्त होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या मुद्द्यांवर नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी सार्वजनिक जनसुनावणी घेण्यात यावी, अशी ठाम मागणीही करण्यात आली आहे. सर्व भागधारकांच्या सहभागातून पर्यावरणपूरक आणि पारदर्शक नियमावली तयार करावी, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या मागणीमुळे पिंपरी-चिंचवड परिसरातील पर्यावरण व नागरी आरोग्य विषय पुन्हा एकदा चर्चेत आला असून प्रशासन काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सर्व RMC प्लॅट्सना पूर्णतः 'डस्ट-फ्री टेक्नॉलॉजी' बंधनकारक करणे, धुळीचे कण नियंत्रित करण्यासाठी सेडिमेंटरी चेंबर्स व आधुनिक फिल्टरेशन प्रणालीचा वापर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन व नियमित ऑडिट, निवासी भागांपासून प्लॅट्ससाठी सुरक्षित अंतर निश्चित करणे, RMC टँकर वाहतुकीसाठी निश्चित वेळापत्रक व नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक दंड, नियमभंग करणाऱ्या प्लॅट्सवर परवाना रद्द किंवा सील करण्याची कारवाई, नागरिकांसाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा किंवा हेल्पलाइन सुरू करणे या मागण्या करण्यात आल्या आहेत.


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in